बीड । मंगळवार
०६.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बारावीचा निकाल जाहीर: राज्याचा निकाल 91.88%, कोकण विभाग सर्वात पुढे



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल आज, ५ मे रोजी जाहीर झाला आहे. यंदा राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला असून, गेल्या वर्षीच्या ९३.३७ टक्क्याच्या तुलनेत निकालात १.४९ टक्क्यांची घसरण झाली आहे.

राज्यातील सर्व विभागांमध्ये कोकण विभागाने ९६.७४ टक्के निकालासह अव्वल स्थान पटकावले आहे. याचवेळी लातूर विभागाने सर्वात कमी म्हणजेच ८९.४६ टक्के निकाल नोंदवला आहे.

नागपूर आणि पुणे विभागांनी प्रत्येकी ९१.३२ टक्के निकाल मिळवला आहे. त्यानंतर नाशिक विभागाचा निकाल ९१.३१ टक्के इतका लागला आहे. कोल्हापूर विभागाने ९३.६४%, मुंबईने ९२.९३%, छत्रपती संभाजीनगरने ९२.२४%, तर अमरावती विभागाने ९१.४३% निकालाची नोंद केली आहे.

या परीक्षेतही मुलींनी आपली आघाडी कायम राखली आहे. मुलींचा निकाल ९४.९८ टक्के तर मुलांचा निकाल ८९.५१ टक्के लागला आहे. ही आकडेवारी मुलींच्या शैक्षणिक यशाला अधोरेखित करणारी आहे.

राज्यातून एकूण १४,२७,०८५ विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,१७,९६९ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि त्यात १३,०२,८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत...

यंदा एकूण १५४ विषयांपैकी ३७ विषयांमध्ये शंभर टक्के निकाल लागले आहेत. ही बाब शिक्षणातील गुणवत्ता वाढल्याचा सकारात्मक संकेत मानली जात आहे.

## 7 मे रोजी अनेक राज्यांत मॉक ड्रिलचे आदेश

### हवाई हल्ला सायरन चाचणी होणार, लाईट देखील बंद

**नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने (चक) ७ मे रोजी अनेक राज्यांना नागरी संरक्षणासाठी मॉक ड्रिल आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत...

न्यूज एजन्सी छख ने सरकारी सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, या सरावात हवाई हल्ल्याच्या चेतावणी सायरनची चाचणी, नागरिक आणि विद्यार्थ्यांना संरक्षण प्रशिक्षण, क्रॅश ब्लॅकआउट उपाय, महत्त्वाच्या स्थळांचे लवकर लपवणूक (कॅमफ्ताज) आणि सुटका योजनेचा सराव यांचा समावेश असेल. या घडामोडींमुळे भारत मोठ्या कारवाईच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. मॉक ड्रिलची प्रमुख उद्दिष्टे –




गृहमंत्रालयाच्या निर्देशानुसार, ७ मे रोजी होणाऱ्या मॉक ड्रिलमध्ये खालील बाबींवर भर दिला जाईल: हवाई हल्ला चेतावणी सायरन: संभाव्य हवाई हल्ल्याच्या परिस्थितीत नागरिकांना सतर्क करण्यासाठी सायरन यंत्रणेची चाचणी.. नागरिकांचे प्रशिक्षण: नागरिक, विशेषतः विद्यार्थ्यांना शत्रूच्या हल्ल्यापासून स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण.

क्रॅश ब्लॅकआउट: रात्रीच्या वेळी सर्व प्रकाश बंद करून अंधार निर्मितीचा सराव, ज्यामुळे शत्रूला लक्ष्य करणे कठीण होईल.

महत्त्वाच्या स्थळांचे संरक्षण रणनीतिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांचे लवकर कॅमफ्लाज.

सुटका योजना: आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतरासाठी सुटका योजनेचा सराव आणि अद्ययावतीकरण.

## बीडचा पाणी प्रश्न तत्काळ सोडवा

### पालकमंत्री ना.अजित पवारांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**डॉ.योगेश क्षीरसागरांच्या मागणीची दखल; लवकरच पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील गंभीर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या मागणीची गंभीर दखल





घेत पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तत्काळ बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शहरातील पाणी टंचाई ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेत आणि पाणंद रस्ते अतिक्रमण हटवण्यासाठी पोलिस बंदोबस्त; गृह विभागाचा आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

शेत आणि पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी राज्य सरकार आता पोलिस बंदोबस्त देणार आहे. यासंदर्भात गृहविभागाने सोमवारी (ता. ५) आदेश दिले आहेत. त्यामुळे आता शेत रस्ता आणि पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेला वेग येईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

शेती कामासाठी मजूर टंचाई मुळे यंत्रांचा वापर केला जात आहे, परंतु शेत रस्त्याच्या मर्यादमुळे यंत्र शेतात घेऊन जाण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच शेतकऱ्यांना लहान-मोठ्या शेती कामासाठी वाहतुकीला मर्यादा येतात. त्याम



ळे शेतकऱ्यांच्या शेत आणि पाणंद रस्त्यांची मोहीम हाती घेण्यात आली. याबद्दल शासन आदेशात अतिक्रमणाबाबत कार्यवाही स्पष्ट करण्यात आली आहे. झरपरपव ठेरव : सातान्यातील अतिक्रमित २०६ पाणंद रस्ते खुते

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आढावा बैठकीत शेत रस्ते आणि पाणंद रस्त्यांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यानुसार नियोजन विभागाने २७ फेब्रुवारी २०१८ रोजीचा शासन निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार पोलिस यंत्रणेमार्फत बंदोबस्त पुरवण्यात यावा, असंही या आदेशात स्पष्ट करण्यात आलं आहे.

विविध योजनांच्या अभिसरणामधून पालकमंत्री शेत पाणंद रस्ते योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गृह विभागाची सहमती घेतली आहे. त्यामुळे संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस यंत्रणेची जबाबदारी ज्या ठिकाणी अतिक्रमण धारक शेतकरी हे नियमानुसार प्रतिसाद देत नाहीत, अशा ठिकाणी पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण काढण्यात यावं. तसेच या बंदोबस्तासाठी पोलिस

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेवटी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांनी मार्ग काढलाच!

**● बीड शहराला आठवड्यातून एकदा नियमित पाणी मिळणारच**
**● साडेसातशे मीटरची पाइपलाइन स्वत: उभे राहून दुरूस्त करून घेतली**

**बीड । प्रतिनिधी**

साडेतीन लाख लोकसंख्या असलेल्या बीड शहराला महिन्यात एकदा पाणी मिळते, तेही मुबलक पाणीसाठा उपलब्ध असून! पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराच्या घशाला कोरड राहते. केवळ श्रेयवादातून बीडकरांचे पाण्यावाचून हाल केले जातात. यात मात्र आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम



एक करून या समस्येतून तोडगा काढण्यासाठी दिवसरात्र एक करून धडपडत आहेत. प्रत्येक अधिवेशन, प्रत्येक नियोजन समितीची बैठक, मंत्र्यांकडे वारंवार बैठका असे सर्वस्तरीय प्रयत्न केले. आणि शेवटी करूनच दाखवले. २० वर्षांपूर्वी झालेल्या पाइपलाइनमध्ये ७५० मीटर पाइपलाइन पूर्णपणे गंजून गेली होती. ती गेल्या महिनाभरात तब्बल ४२ डिग्री तापमानात, भर उन्हात आणि रात्री उशिरा देखील आ.संदीप क्षीरसागर आणि माजी

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडचा बिहार होतोय का? जेव्हा पोलिस कर्मचारीच एसपींच्या घरी ओढतो गांजा

**बीड । प्रतिनिधी**

गुन्हेगारी, खंडणी, गावगुंडशाही, पीक विमा घोटाळे आणि हत्यांची मालिका यामुळे चर्चेत आलेल्या बीड जिल्ह्याचा गुन्हेगारी नकाशा दिवसेंदिवस गडद होत चालला आहे. 'बीडचा बिहार झाला का?' असा सवाल सध्या जनमानसात ऐकू येतो आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकारने डॅशिंग आणि कठोर कारवाईसाठी ओळखले जाणारे आयपीएस अधिकारी नवनीत कॉवत यांची बीडच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती केली.

कॉवत यांनी हद्दीत येताच अवैध धंद्यांविरोधात मोहीम उघडली आणि काही दिवसांतच कारवायांचे लोण पसरले. मात्र, पोलीस यंत्रणेतीलच एका कर्मचाऱ्याने त्यांच्या बंगल्यात गांजा सेवन केल्याने संपूर्ण पोलीस खात्याच्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे.

एसपींच्याच घरात 'गांजावाला' पोलिस!

घटना अत्यंत धक्कादायक आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या निवासस्थानी



रात्री ९.३० च्या सुमारास, बाळू बहिरवाळ नावाच्या पोलीस कर्मचाऱ्याला एसपींनी स्वतः गांजा सेवन करताना रंगेहाथ पकडले. सध्या एसपींच्या बंगल्यावर दुरुस्तीचे काम सुरू असल्यामुळे ते त्यांच्या कुटुंबासह काही काळासाठी गेस्ट हाऊसमध्ये राहत आहेत. घराची पाहणी करण्यासाठी ते बंगल्यावर गेले असताना हा प्रकार उघड झाला.

दरवाजा ठोठावूनही उघडला न गेल्याने एसपींना संशय आला आणि दरवाजा उघडल्यावर गांजाचा तीव्र वास त्यांना जाणवला. त्यानंतर त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याला सूचना देत, बाळूला ताब्यात घेतले आणि वैद्यकीय चाचणीसाठी पाठवले. चाचणीत गांजाचे सेवन स्पष्ट झाल्यानंतर, त्याच्यावर एनडीपीएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल ▶▶ उर्वरित पान २ वर

## वडिलांच्या हत्येनंतरही डगमगली नाही वैभवी देशमुखने बारावीत मिळवले ८५% गुण



**बीड । प्रतिनिधी**

एकीकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला घरात रडणारी आई, लहान भाऊ आणि संपूर्ण गाव हतबुद्ध. पण या सगळ्या अंधारातही वैभवी देशमुखने आपला आत्मविश्वास टिकवला, ध्येयाला धरून राहिली आणि बारावी परीक्षेत ८५.१३% गुण मिळवत झळाळते यश मिळवले!

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या झाली. या अमानवी कृत्याने संपूर्ण महाराष्ट्र हेलावून गेला. वडिलांच्या अकस्मात ▶ उर्वरित पान २ वर



# लोककल्याणकारी राजा ; राजर्षी छत्रपती शाहू महाराज

आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०३ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल



हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिटयूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

पान ४ वरून पुढे...

## बीडकरांना महिनाभर ...

बीडकरांना महिन्यांपासून नळाला पाणी नाही.रखरखत्या ऊन्हात सुर्य आग ओकत असताना बीडकरांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते.शहरासाठी बिंदुसरा धरणातुन एक, माजलगाव धरणावरून माजलगाव बक वाटर आणि अमृत अटल अशा ३ योजना आहेत.परंतु लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांचे दुर्लक्ष असुन नगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि काम करणाऱ्या मे प्रगती कन्स्ट्रक्शन या ठेकेदार यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे पाणी योजनेचा बोजवारा उडाला असुन ऐन भर उन्हाळ्यात दुरूस्तीच्या कामामुळे अनेक भागात महिनाभरापासून नळाला पाणी नसल्याने पाणीबाणी सुरू आहे बीड शहरासाठी ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांच्या हलगर्जीपणामुळे २ वर्षे कालमर्यादा असताना अद्याप ७ वर्षे उलटूनही रखडलेल्या अवस्थेत आहे.त्यामुळे बीडकरांना तिव्र पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असुन संबंधितांवर कठोर कारवाई करून काम पूर्ण करण्यात यावे.तसेच बीड शहराला नियमित पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रुपये थकबाकीसाठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.

## भीषण पाणी...

ठराविक कुटुंबाची सत्ता आहे व त्यांनी आपल्या सत्तेच्या कालखंडात बीड शहरातील कोणत्याही समस्या सोडविल्या नाहीत. त्या समस्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत त्या अद्याप पर्यंत पूर्ण केलेल्या नाहीत किंवा त्यांची तशी मानसिकता व योग्य दिशा त्यांच्याकडून दिसत नाही. बीड नगर परिषदेची प्रशासन संपूर्णतः कोलमडले असून शहरातील नागरिकांना स्वच्छता, पाणीपुरवठा ,विद्युत पथदिवे व इतर पायाभूत सुविधा साठी झगडावे लागत आहे. ज्यांना निवडून दिले ते फक्त आम्हीच किती कर्तुत्ववान आहोत असा भ्रम लोकांमध्ये निर्माण करून स्वतःचे गुणगान गात आहेत. हे आम्हीच केले, कोर्टात आमुक केलं, तमुक केलं यांतच ते मग्न आहेत. सर्व सामान्य जनतेच्या पायाभूत सुविधांवर यांना काहीच घेणे देणे नाही. या सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर बीड नगर परिषदेवर शुक्रवार दिनांक ९ मे २०२५ रोजी

पान ४ वरून पुढे...

सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासून बीड नगर परिषद कार्यालय भव्य हंठा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम, लोकपत्रकार भागवत तावरे, शेख अमर, खय्युम इनामदार, शेख खदीर, शेख जाकीर, सय्यद आजम, पठाण आयुब, मोमीन जुबेर आदींनी केले आहे.

## युवा ग्रामीण...

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिका-यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बीड जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली बांधकाम कामगार यांनी दि. ८ मे २०२५ गुरुवार रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालय समोर ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे लेखी निवेदनाद्वारे जि ल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड, यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री , कामगार विभाग मंत्री, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व बांधकाम विभाग यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील बांधकाम कामगार हे राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.रस्ते, ईमारती,पुल आणि इतर अनेक बांधकाम प्रकल्पांवर काम करतात हे काम अतिशय कठीण धोकादायक असते.कामगारांमध्ये पुरूष आणि महिला दोघेही समाविष्ट असतात.बांधकाम क्षेत्रातील कामगार हे बहुतांश वेळा असुरक्षित, असंघटित आणि अल्पशिक्षित असतात तसेच त्यांना नियमित रोजगार, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य मिळत नाही याच कारणांमुळे महाराष्ट्र सरकारने बांधकाम कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ( चइजउथ) सारख्या संस्थांची स्थापना केली.या मंडळामार्फत विविध क्षेत्रातील बांधकाम कामगारांची नोंद केली जाते.बांधकाम कामगार योजनेंतर्गत नोंदणीकृत कामगारांसाठी

पान ४ वरून पुढे...

८४ प्रकारच्या विविध योजना राबविल्या जातात. ज्यामध्ये सामाजिक सुरक्षा योजना, शैक्षणिक योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक योजनांचा समावेश आहे.बांधकाम कामगारांना या योजनांचा लाभ घेण्यासाठी आँनलाईन किंवा आफलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण दरवर्षी करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकारी यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशानुसार ग्राम विकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे पंचायत समितीच्या या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण रखडले असून शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळाच्या योजनेअंतर्गत विविध कल्याणकारी योजना पासून बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबे वंचित आहेत .त्यामुळे शासन स्तरावर जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकाऱ्यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दूर करण्यात यावी ह्या प्रमुख मागणीसाठी ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे युवा आघाडी जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी सांगितले .

## बांधकाम कामगारांनी...

कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) चा कॅम्प घेण्यात येणार आहे.

तरी या कॅम्पमध्ये माजलगाव तालुक्यातील संपूर्ण जीवित नोंदणी कृत बांधकाम कामगार लाभार्थीने या योजनेचा लाभ घ्यावा व कोणीही बांधकाम कामगार या योजनेतून वंचित राहूनय म्हणून बांधकाम मजूर संघटनाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख हमीद (शफिक भाऊ) यांनी बातमीच्या मध्येमातून कामगारांना सांगितले.

## विमानं-रणगाडे..

दिसत नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. सरकार पाकिस्तानवर बॉम्ब टाकत नाही. बॉम्ब गोडाऊनमध्ये फक्त साठवून ठेवले आहेत. हे ट्रक खपाखप ट्रकमधून नेऊन पाकिस्तानवर टाकायला पाहिजेत, असेही मनोज जरांगे यांनी म्हटले.

पान ४ वरून पुढे...

## बीड, हिंगोलीमध्ये...

वर्तवली आहे, मराठवाड्यात ७ मे रोजी, विदर्भात देखील अवकाळी पावसासोबतच गारपिटीची शक्यता आहे.

मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, घाटपरिसर, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, कोकण-गोवा या विभागांमध्ये आज आणि उद्या पावसाचा अलर्ट आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जालना, बीड, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, या जिल्ह्यांमध्ये आज (मंगळवारी) वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

बीडमध्ये अवकाळी पावसानं झोडपले- बीड जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपून काढलं. काल (सोमवारी) दुपारनंतर जिल्ह्यातील बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी आणि केज तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. तर अनेक ठिकाणी गारपीट देखील झाली. परिणामी काढणीला आलेल्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. दुपारनंतर सुरू झालेला पाऊस हा मध्यरात्रीपर्यंत सुरू होता. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला आहे. या पावसाने उकाड्यापासून दिलासा मिळाला असला तरी शेतकऱ्यांच्या पिकांचं मात्र मोठं नुकसान झालं आहे. आंबा, मोसंबी, डाळिंब या फळबागांसह इतर पिकांना अवकाळी पावसासह गारपिटीचा फटका बसला आहे. त्यामुळे याचे पंचनामे करून मदत मिळावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

हिंगोली वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागा जमीन दोस्त

काल हिंगोली जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वादळी वारे अवकाळी पाऊस यासह काही ठिकाणी गारपीट झाली आहे. याचा फटका मोठ्या प्रमाणात शेतातील केळीच्या बागांना बसला आहे. केळीच्या बागा वादळी वाऱ्यामुळे जमीनदोस्त झाल्या आहेत. जिल्ह्यातील गिरगाव कुरुंदा दांडेगाव वडगाव या शिवारामध्ये वादळी वाऱ्याचा केळीच्या बागांना मोठ्या प्रमाणामध्ये फटका बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. तयार झालेले केळी सुद्धा मोडून पडल्या आहेत. त्यामुळे केळी उत्पादक शेतकरी मोठे संकटात सापडले आहेत.

पान १ वरून पुढे...

## बीडचा पाणी...

दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बीड शहरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून नियमित आणि वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येच्या समाधानासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांची भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी हा प्रश्न पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर मांडला. त्यानंतर अजितदादा यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रशासनाकडून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. प्रशासनाकडून लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पावले उचलण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांतून समाधान व्यक्त होत असून, लवकरच शहरातील पाणी टंचाई दूर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शेत आणि...

यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा शुल्क आकरण्यात येऊ नये, असंही आदेशात स्पष्ट करण्यात आलं आहे.गरजेनुसार सर्व प्रकारच्या शेत व पाणंद रस्त्यांचं अतिक्रमण काढणं आणि मोजणी करण्यात येणार

पान १ वरून पुढे...

आहे. त्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या मागणी पत्रानुसार पोलीस बंदोबस्त पुरविण्याचे अधिकार तालुका स्तरावरील पोलीस निरीक्षक यांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहे. तसेच शेत आणि पाणंद रस्त्यांची मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागाच्या निश्चित केलेल्या मापदंडानुसार रस्ते तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## शेवटी आ.संदीप...

आ.सय्यद सलीम यांनी स्वतः उभे राहून पाइपलाइन दुरूस्ती करून घेतली. तसेच वीज पुरवठ्याबाबत असलेली तांत्रिक अडचण दूर करून पाणीपुरवठ्याबाबत असलेले बीड शहरासमोरील मोठे प्रश्नचिन्ह दूर केले. आता बीड शहराला किमान ६ दिवसाला पाणी मिळणार आहे. शेवटी आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी करूनच दाखवले आणि बीडची पाणीबाणी मार्गी लावली.

## बीडचा बिहार ....

करण्यात आला आणि त्याला सेवेतून तत्काळ निलंबित करण्यात आले. पोलीस सुधारणेच्या मोहिमेतूनच उघड झालेली कुजलेली व्यवस्था? बीड जिल्ह्यातील ही घटना नुसतीच खळबळजनक नाही,

पान १ वरून पुढे...

तर ती बीडमधील पोलीस यंत्रणेमधील अंतर्गत शिस्तभंग आणि ढिसाळ पाळणीतून निर्माण झालेल्या गुन्हेगारीला उघड करते. एसपी नवनीत कॉवत यांच्यासारखे अधिकारी सखोल तपास आणि आक्रमक कारवाया करत असतानाच त्यांच्या स्वतःच्या देखरेखीतील पोलीस कर्मचाऱ्याचा असे गंभीर गैरवर्तन उघड होणे ही संपूर्ण व्यवस्थेचं दुर्दैवी प्रतिबिंब आहे.

बीड जिल्ह्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर एक नजर बीडचा गुन्हेगारीचा इतिहास नवीन नाही: पवनचक्की प्रकरणात संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या, खंडणी पॅटर्न, गावगुंडशाहीचा प्रभाव, पीक विमा घोटाळ्यांसारख्या आर्थिक अपघातांची मालिका, या सर्व घटनांत अनेक वेळा पोलीस यंत्रणेवरच माफियांना अभय देण्याचे आरोप झाले आहेत. आरोपी खुलेआम वावरतात आणि तपास अपूर्णच राहतो, असे वारंवार दिसून आले आहे.

बीड बदलतंय, पण यंत्रणेलाच सुधारणेची गरज एसपी नवनीत कॉवत यांच्यासारख्या अधिकाऱ्यांनी बीडमध्ये केलेल्या कारवाया कौतुकास्पद आहेत. मात्र, गुन्हेगारांवर कारवाई करण्यापेक्षा आधी, पोलीस यंत्रणेतच स्वच्छता मोहीम राबवणं आवश्यक असल्याचं ही घटना दाखवून देते. प्रशासनाच्या प्रत्येक थरावर शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी निर्माण झाली, तरच बीडसारखे जिल्हे गुन्हेगारीपासून मोकळे होऊ शकतात.

पान १ वरून पुढे...

## वडिलांच्या हत्येनंतरही...

मृत्यूनंतर केवळ वैभवीवरच नव्हे, तर संपूर्ण देशमुख कुटुंबावर दुःखाचे सावट पसरले होते. मात्र, वैभवीने अशा कठीण प्रसंगी हार मानली नाही. वडिलांच्या मारेकऱ्यांना शिक्षा मिळावी म्हणून ती काकांसोबत आंदोलनात सहभागी झाली. आई आणि लहान भावाला सावरण्याची जबाबदारीही तिने खांद्यावर घेतली. परीक्षेचा काळ सुरू असतानाही तिचे आंदोलनासाठी दौरे सुरूच होते. वडिलांसाठी न्याय मिळेपर्यंत मी लढणारच, हा तिचा निर्धार आज साऱ्यांना प्रेरणा देणारा ठरतोय. अखेर आज जेव्हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केला, तेव्हा वैभवीच्या मेहनतीचं फळ सर्वांसमोर आलं. ८५.१३% गुण! तिच्या या यशाने संपूर्ण मस्साजोग गाव अभिमानाने भरून आलं. आज संतोष देशमुख असते, तर मुलीच्या यशाने त्यांचे डोळे पाणावले असते, अशी भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. यावर्षी राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला असून, मुलींनी पुन्हा एकदा बाजी मारली आहे. एकूण ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या, तर मुलांची टक्केवारी ८९.५१ इतकी आहे. वैभवीचा हा संघर्ष, तिची जिद्द आणि धैर्य केवळ परीक्षेपुरते मर्यादित नाही, तर ती आजच्या पिढीसाठी आदर्श ठरत आहे. दुःखातही उभं राहायचं, संघर्षातही शिकायचं आणि शेवटी यश मिळवायचं हेच तिचं शिकवण आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# इयत्ता बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे दैं. मराठवाडा पत्र तर्फे हार्दिक अभिनंदन



*कु.अनुष्का सुलेख कलंत्री हिने लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयातून वाणिज्य शाखेमध्ये इयत्ता बारावी मध्ये ९६.१७% मार्क घेऊन घवघवीत यश संपादन करून शाहू महाविद्यालय वाणिज्य १२ वी मध्ये प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल तिचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.*

## अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून १२ वी परीक्षेत मोनिका सिरसाट प्रथम

### प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ८२.१७ टक्के गुण संपादन करून मिळविले घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या अंथरवन पिंपरी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी मोनिका राजेभाऊ सिरसाट हिने इयत्ता १२ वी (कला शाखा) परीक्षेत ८२.१७ टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन करून माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल तिचे आईवडील, कॉलेज प्रशासन, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन केले आहे.

माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील रहिवासी असणारे अशिक्षित परंतु मोठं कुटुंब या मोठ्या कुटुंबात गरिबी परिस्थिती असतानाही खचून न जाता दिवस-रात्र काबाडकष्ट मेहनत करून आपल्या लाडक्या सात ही कन्यांचे शिक्षण आणि त्यांचे यशस्वी संगोपन, विवाह करणाऱ्या राजाभाऊ सिरसाट आणि त्यांच्या पत्नी सौ. लता सिरसाट या दांम्पत्याने आपल्या



सातही मुलींना उच्च शिक्षण दिले. काही मुलींचे विवाह करून त्यांचा सुखाचा संसार सुरू करून दिला. सातव्या क्रमांकाची मुलगी कु. मोनिका हिला विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा होता. परंतु परिस्थितीमुळे तिला विज्ञान शाखेला प्रवेश घेता आला नाही. दरम्यान तिने कला शाखेत प्रवेश घेऊन परिस्थितीवर मात करून हलाकीच्या परिस्थितीत प्रचंड अभ्यास करून परिस्थितीवर मात केली. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेमध्ये मोनिका सिरसाट हिने ८२.१७ टक्के गुण संपादित करून अंथरवन पिंपरी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून तिने प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे आईवडील, संस्थेचे संस्थाचालक दिनेश पवार साहेब, प्राचार्य खंदारे सर, प्रा.पवार सर, प्रा.सिरसाट सर, प्रा. आखाडे सर, प्रा. श्रीमती तांबे मॅडम, प्रा.श्रीमती लगसकर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती कांबळे मॅडम, सहशिक्षिका श्रीमती खंदारे मॅडम यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, नातेवाईक आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.



*कुमारी ईश्वरी दादासाहेब बजगुडे हिने इयत्ता बारावी विज्ञान बोर्ड परीक्षेत ८१ % प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले त्याबद्दल तीचे हार्दिक अभिनंदन.*



उधान मृत्युंजय जनमेजय
८०%



बागडे रेणुका सचिन
६९:३३%

## बारावीच्या परीक्षेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाला असुन सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखाचा ९७.२९ टक्के, कला शाखेचा ६७.१७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.९४ टक्के, व्यावसायिक अभ्यासक्रम ६६.२९ टक्के निकाल लागला आहे . बारावीच्या परीक्षेत सुंदराव सोळंके महाविद्यालयातील विज्ञान शाखेतुन प्रथम नायबळ अनुप शरद(९०.६७ %), द्वितीय झरेकर दिग्विजय सुरेश (८९.८३% ), तृतीय मुंदडा रोहन संदीप व रुद्रवार ओजस्वीनी सचिन (८७.५० %), कला शाखातुन प्रथम भडके राणी माणिकराव (८१.५० %),द्वितीय बोचरे योगिता दत्तात्रय (७७.६७ %),तृतीय राऊत शुभांगी कारभारी (७६.३२%) वाणिज्य शाखा: प्रथम कुरे अंजली प्रल्हाद (८७.५०%), द्वितीय शेजुळ धनश्री उद्धवराव (८६.१७%), तृतीय राऊत पायल सचिन व कोळपे धनश्री शंकर (८१%) तर व्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम कापसे ऋतुजा मधुकर (७५.५०%), द्वितीय पौळ साक्षी सुदाम (७२.३३% ), तृतीय रावले पूजा महादेव (७०.६७%) यांनी यश संपादन केले. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह विकास समिती सदस्य ऍड.भानुदासराव डक,माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ.बी. एल.चव्हाण,प्राचार्य डॉ.जी. के. सानप, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे प्रा.स्वप्निल टाक, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधिक्षक सतीश एरंडे यांनी अभिनंदन केले.

## श्री नारायण मा.व उ. मा. विद्यालय आहेर चिंचोली इ. १२ वीचा निकाल ९४.२३ टक्के लागला

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री नारायण मा. व.उ.मा. विद्यालय आहेर चिंचोली विज्ञान शाखेचा निकाल ९८.८० टक्के लागला आहे.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नारायण महाविद्यालयाने आपली निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. फ ेब्रुवारी २०२५ मध्ये इयत्ता बारावी मध्ये प्रविष्ट विद्यार्थी विज्ञान शाखेत १६७ पैकी १०९ विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत ५३ उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक मस्के गौरव गणेश - ८९.५०, द्वितीय क्रमांक घोडके समृद्धी अजय - ८८.८३, तृतीय क्रमांक - जाजू प्रांजल अजय - ८८.३३, कला शाखेचा निकाल ८४.२१ टक्के



लागला असून प्रथम क्रमांक गाढवे तनुजा आसाराम ७७.००%, द्वितीय क्रमांक , पारखे शितल अशोक ७४.३३%, वाघम ोडे अंजना सुंदर ७२.८३%. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष माननीय श्री



महादेवरावजी काळे अण्णा , संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, प्राध्यापक अशोक घरत सर, प्रा. मस्के जी. बी, प्रा. पौळ डी.बी,सौ. भुतावळे बि. आर , प्रा.रकटे पी. आर , प्रा.मुरमुडे



ए .एन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परिसरातील ग्रामस्थ, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे व सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या .

## पृथ्वी होळकरचे १२ वी परिक्षेत घवघवीत यश जन्मदिनी आला निकाल मिळविले ९० टक्के गुण

**बीड । प्रतिनिधी**

येथील पृथ्वी संजय होळकर याने बारावीच्या परिक्षेत घवघवीत यश संपादन करत स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशीच कुटूंबियांना व मित्रपरिवाराला यशस्वी भेट दिली आहे. बोर्डाच्या परिक्षेत पृथ्वी होळकर याने ८९.८३ टक्के म्हणजे जवळपास ९० टक्के गुण मिळवल्यामुळे त्याचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

पृथ्वी होळकर हा जननगरसेवक संजय होळकर यांचा व नर्सिंग ऑफिसर नंदिनी होळकर यांचा मुलगा असून माजी आदर्श मुख्याध्यापक बाबुराव होळकर यांचा नातू व संपादक राजेंद्र होळकर यांचा पुतण्या आहे. त्याच्या १८ व्या वाढदिवसाच्या दिवशीच त्याने घेतलेल्या मेहनतीचे फळ त्याला मिळाले आहे त्याच्या या यशाचे श्रेय त्याने आपल्या परिवारासह शाळा, कॉलेजमधील शिक्षकांना दिले आहे.

तसेच त्याने क्रॉपसायन्समध्ये २०० पैकी २०० गुण मिळविले असून बायोलॉजीमध्ये ९६ गुण मिळविले असून एकुण ६०० पैकी ५३९ एवढे गुण



मिळविले आहेत त्याच्या यशाबद्दल त्याचे नातेवाईक, मित्रपरिवारातून कौतुक होत आहे.

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या महाराष्ट्र शासनाच्या योजनेच्या जलरथाचे मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या हस्ते उद्घाटन

**● जलरथांच्या माध्यमातून 'तलावांचे पुनरुज्जीवन' कामांना वेग शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व गावांनी पुढे यावे**

**बीड । प्रतिनिधी**

गाळमुक्त धरण व गाळ युक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण हि योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या योजनेचा प्रचार प्रसार करण्याचे काम भारतीय जैन संघटना करीत आहे. या योजनेच्या प्रचार रथाचे उद्धाटन आज दिनांक ५ मे रोजी जिल्हाधिकारी श्री. विवेकजी जॉन्सन व अप्पर जिल्हाधिकारी श्री हरिष धार्मिक यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी



कार्यालय बीड येथे पार पडले यावेळी उपस्थित जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री संजय आमले, सहाय्यक जलसंधारण अधिकारी श्री शुभम हासबे, जलसंधारण अधिकारी सचिन ठोंबरे सर्व मृदू व जलसंधारण विभाग बीड तसेच भारतीय जैन संघटनेचे सकल जैन समाज अध्यक्ष प्रेमचंदजी लोढा, समाजरत्न विजयराज बंब भाजपा शहराध्यक्ष अशोक लोढा, इगड जिल्हा अध्यक्ष अमित पगारिया, जिल्हा सचिव सुशील मुनोत, जिल्हा उपाध्यक्ष राजु संचेती, बाबुशेठ खिवंसरा, राजेंद्र मुनोत, गौतम खटोड, आशिष जैन, प्रविण बोरा, मदन दुग्गड, सुशील खटोड, सचिन लोढा, सचिन कांकरिया, निलेश ललवाणी, आनंद ललवाणी, अक्षय लोढा इगड जिल्हा समन्वयक जयराम शिंदे आदी. महाराष्ट्र शासनाच्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात युद्धपातळीवर काम सुरू झाले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा जलरथद्वारे प्रचार-प्रसार तथा जनजागृती केली जात आहे. या जलरथांना राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा, तालुका पातळीवर मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. जिल्हाधिकारी, झेडपी सीईओ, जलसंधारण अधिकारी, गट विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्रामसेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पीपीटी सादरीकरण या माध्यमातून हे प्रशिक्षण दिले जात आहे. आतापर्यंत या योजनेचा प्रचार-प्रसार करणार्या जलरथाचे उद्धाटन राज्यातील २३ जिल्ह्यात संपन्न झाले. यात अहिल्यानगर, अकोला, भंडारा, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, जळगाव, जालना, नंदुरबार, सांगली, सातारा, सोलापूर, वाशिम, यवतमाळ, धुळे, वर्धा, अमरावती, धाराशीव, गडचिरोली, लातूर, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर आदी जिल्ह्यांचा समावेश आहे.'योजनेची सर्व माहिती तसेच अर्ज करण्यासाठी 'गाळमुक्त धरण' म्हणजेच "www.shiwaar.com' या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७५०/२०२५**

**सुशालाबाई विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) सुशालाबाई भ्र. सर्जेराव कोटुळे वय: ६८ वर्षे, धंदा: शेती, २) संजय पि. सर्जेराव कोटुळे वय: ३५ वर्षे, धंदा: शेती, ३) बाळु पि.सर्जेराव कोटुळे वय: ३८वर्षे, धंदा: शेती , सर्व रा. पिंपरगव्हाण ता.जि.बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **सर्जेराव लिंबाजी कोटुळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सर्जेराव लिंबाजी कोटुळे रा. पिंपरगव्हाण ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : २५.०५.२०२१ रोजी शासकीय रूग्णालय, बीड ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील हे ब-याच वर्षांपूर्वी मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सर्जेराव लिंबाजी कोटुळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १७/०६/२०२५.

**(मार्फत- ॲड. बारगजे ए. एन.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक
# मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com

मंगळवार, दि.०६ मे २०२५ पान ४

## बीड जिल्ह्यात वादळी वारे आणि गारांसह मुसळधार पाउस ; वीज कोसळून तरुणाचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

हवामान विभागाने सूचित केल्यानुसार सोमवारी सायंकाळी अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात वादळी वाऱ्यांसह गारपिटीचा जोरदार पाऊस झाला. यावेळी शहरालगत असलेल्या मगरवाडी येथे वीज कोसळून एका तरुणाचा मृत्यू झाला. सचिन मधुकर मगर (वय ३८, रा. मगरवाडी) असे मयत तरुणाचे नाव आहे. सुमारे अर्धा तास पडलेल्या पावसामुळे अंबाजोगाईत शहरातील नाल्या ओसंडून वाहून रस्त्यांवर पाणी साचले. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे शहरवासीयांची चांगलीच धांदल उडाली. नागरिक दुकाने, टपऱ्या आणि इतर आडोशांखाली धाव घेताना दिसले. नेहमी प्रमाणेच पाऊस सुरू झाला की शहरातील बहुतांशी भागात वीजपुरवठाही खंडित झाल्याचे वृत्त आहे.



# बीडकरांना महिनाभर नळाला पाणी नाही, व्हाल्ववर पाणी भरण्याची वेळ

## पाण्याअभावी बीडकरांचे हाल निषेधार्थ अजितदादांच्या प्रतिमेला अभ्यंग स्नान लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जनतेला महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने पाणीबाणी सुरू असुन ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांनी २ वर्षं कालमर्यादा असतानाही ७ वर्षे उलटूनही अद्याप रखडलेल्या अवस्थेत असल्याने कारवाई करण्यात यावी तसेच पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रूपये थकबाकी साठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. बीडकरांची तहान आणि घशाची कोरड हे लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ठेकेदार जलयोजनेचे मारेकरी आहेत. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन



मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडकरांना वा-यावर सोडले असुन पाण्याअभावी बीडकरांचे हाल होत असुन केवळ बीडच्या पाणीपुरवठ्यासाठी बैठकांचा फार्स



होत असुन यांच्या निषेधार्थ आणि बीड शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०५ सोमवार रोजी बीड शहरातील राजीव गांधी चौक परीसरातील नारायणी इंग्लिश स्कूल समोरील व्हाल्ववर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभ्यंगस्नान लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शेख मुस्ताक, रामनाथ खोड आणि आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे सहभागी होते. शहरी भागात प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर पाणी मिळावे असा दंडक आहे.परंतु ▶▶ उर्वरित पान २ वर

## भीषण पाणी टंचाई संदर्भात बीड नगर परिषदेच्या विरोधात शुक्रवारी भव्य हंडा मोर्चा - शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**



सध्या तीव्र उन्हाळ्यामुळे उन्हाची तीव्रता वाढली असुन बीड शहर व परिसरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी बिंदुसरा धरण व माजलगाव बॅक वॉटर योजनेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा केला जातो परंतु माजलगाव बॅक वॉटर योजनेतील काडी वडगाव येथे पाईपलाईन फुटल्यामुळे व इतर तांत्रिक अडचणीमुळे बीड शहराला होणारा पाणीपुरवठा मागील एक महिन्यापासून खंडित आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वन वन फिरावे लागत आहे. लोकांना पाण्यासाठी अतिरिक्त पैसे मोजून टँकर द्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक अत्यंत परेशान झालेला आहे. बीड मतदार संघाचे लोकप्रतिनिधी फक्त पाणी टंचाई संदर्भातील समस्ये कडे कोणतीही ठोस उपाययोजना न करता सोशल मीडिया व वर्तमानपत्राद्वारे आपले फोटो छापून आणण्याची हौस पूर्ण करीत आहेत. या व्यतिरिक्त त्यांचे कोणतेही वैधानिक काम या संदर्भात केलेले दिसत नाही. मागील ५० वर्षापासून बीड शहरावर ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व इतर संघटनांच्या पदाधिकाऱ्याकडून अशोक रसाळ यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली रसाळ यांची व शिक्षक संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य नामदेवराव शिंदे सर, प्रहार शिक्षक संघटनाचे गोविंदजी वायकर सर, महाराष्ट्र शिक्षक संघाची जीवन बागलाने सर संघटक बाबासाहेब देवगुडे, सर्व शिक्षक संघटनांचे सल्लागार शाम रावजी मुळे सर, शिक्षक संघटनेचे जेष्ठ बन्सी हावळे सर, भाजपा



शिक्षक आघाडीचे थापडे सर, भाजप शिक्षक आघाडीचे भारत जीतोंडे सर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते घोडके सर, चिंचकर सर जायभाय सर शिंदे सर जामकर सर आगलावे सर फसले सर हाडोळे सर कवडे सर गणेश शिंपले सर मोतवाल सर अहिरे सर व अनेक शिक्षक व विविध संघटनांचे शिक्षण यावेळी उपस्थित होते, यावेळी अशोक रसाळ यांच्या समवेत भाजपचे विद्यार्थी आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष सुरेश पवार भाजपचे दत्ताजी रसाळ, तुषार लाड हे उपस्थित होते.



*बीड: आहेर धानोरा बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह निमित्त श्री.ह.भ.प.प.पु.गु.महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज मठाधीपदी संस्थान श्रीक्षेत्र संस्थान नारायण गड बीड यांचा सत्कार करताना वरवटी व आहेर धानोरा बीड येथील सरपंच बालासाहेब आबा इंगोले व मराठा महासंघाचे विनोद आप्पा इंगोले, बंडू आप्पा कोलंगडे, विलास इंगोले आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

## युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने बांधकाम कामगारांच्या मागण्यांसाठी 8 मे रोजी लिंबागणेश येथे ठिय्या आंदोलन - हरिओम क्षीरसागर

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ ते १० महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असते .प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे मात्र यासाठी ९० दिवस काम ग्रामसेवक यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास



अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणा-या मुला मुलींच्या शिक्षणासाठी मदत,सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून ▶▶ उर्वरित पान २ वर

## बांधकाम कामगारांनी गृहवस्तू व अत्यावश्यक सुरक्षा संच (पेटी) कॅम्पचा लाभ घ्यावा : शफिक भाऊ

### जुनी नगरपरिषद माजलगाव येथे ६ मे रोजी सकाळी १०वाजता होणार कॅम्प

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,बीड चे अधिकारी श्री मुंडे सारांच्या वतीने पूर्ण बीड जिल्ह्यात जीवित नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी वस्तू अत्यावश्यक



सुरक्षा संच (पेटी) या योजनेचा कॅम्प घेऊन लाभ देण्यात येत आहे. यामध्ये माजलगाव येथे श्री मुंडे सर यांच्याच मार्गदर्शना खाली दिनांक ६ मे रोजी सकाळी ठीक १०:०० वाजल्यापासून जीवित नोंदणीकृत ▶▶ उर्वरित पान २ वर

## विमानं-रणगाडे पळवून नुसतं डिझेल जाळतायत, हे पहलगमचा बदला घेणार नाहीत, मनोज जरांगे पाटीलचा हल्ला

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला हे सरकार घेणार नाही. सध्या फक्त विमानं आणि रणगाडे पळताना दिसत आहेत. सरकार फक्त विमानाचे डिझेल नासवत आहे, अशी खरमरीत टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे



पाटील यांनी केली. सरकारने जनतेच्या जीवाशी खेळता कामा नये. पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. ते सोमवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अटलबिहारी वाजपेयी यांनी एकदाच प्रयोग केला होता, सगळा देश हा हादरून गेला होता, त्यांना सगळे भीत होते, यांना कोणीच भीत नाही. फक्त तिकडे पाण्याची आणीबाणी सुरू झाली म्हणून सांगतात तिकडे तर पाणी सन्नाट वाहत आहे. हे नुसते विमानाचे रणगाड्याचे, ट्रक मध्ये फौजी लोक बसवलेले, पळालेले दाखवतात, पहिले व्हिडिओ आहेत की आत्ताचे आहेत याचा मेळ लागत नाही. नुसतं युद्धजन्य परिस्थिती दाखवतात. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या दिवशी तीच परिस्थिती असते. तेच तेच व्हिडिओ दाखवतात असं वाटते. मोदी सरकार हे अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारखा दरारा निर्माण करताना ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड, हिगोंलीमध्ये मुसळधार पाऊस; २३ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता, ‘वाचा हवामान विभागाचा अंदाज



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काल (सोमवारी) बीड जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपून काढलं. काल (सोमवारी) दुपारनंतर जिल्ह्यातील बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी आणि केज तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. तर अनेक ठिकाणी गारपीट देखील झाली. परिणामी काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर (काल) सोमवारी हिंगोली जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वादळी वारे अवकाळी पाऊस यासह काही ठिकाणी गारपीट झाली आहे, याचा फटका मोठ्या प्रमाणात शेतातील केळीच्या बागेला बसला आहे. अवकाळी पाऊस आणि गारांमुळे केळींच्या बागांचं काही प्रमाणात नुकसान झालं आहे. राज्याच्या कोणत्या जिल्ह्यात पावसाची शक्यता ?

महाराष्ट्रात पुढच्या चार ते पाच दिवसांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवली आहे, काही भागात अवकाळी पावसासोबत गारपिटीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईमध्ये ६ आणि ७ मे रोजी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ५ ते ७ मे दरम्यान नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव अवकाळीच्या पावसासोबतच गारपिटीची शक्यता वर्तवली आहे. अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूरमध्ये ६ व ७ मे रोजी पावसाची शक्यता ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK